# <u>नियमित दिवाणी दावा क्र. २७७/२०१५ मधील नि.क्र. ८३ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार शिवनाथ यशवंत पवार यांनी दिनांक २७.०३.२०१७ रोजी करुन ठेवले मृत्यूप्रमाणपत्राबाबत दुय्यम पुरावा अभिलेखात दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी, करीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ प्रतिवादी क्र. १अ (प्रतिवादी क्र.२) याने त्याचे शपथपत्र नि.क्र.८४ नुसार दाखल केलेले आहे.

०२. प्रतिवादी असे कथन करतात की, प्रतिवादी यांचे पुर्व हक्कदार शिवनाथ यशवंत पवार यांनी दावा मिळकत ग. नं. २२७४ मधील संपूर्ण हिस्सा मृत्यूपत्राने प्रतिवादी क्र. १अ (प्रतिवादी क्र. २) यांच्या लाभात दिनांक २७.०३.२०१७ रोजी करुन ठेवले होते. सदर मृत्यूपत्रासंदर्भात प्रतिवादी क्र. १अ (प्रतिवादी क्र. २) यांनी वडूज येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांच्या न्यायालयात प्रोबेट अर्ज क्र. ६/२०१९ दाखल केला होता. सदर प्रोबेट अर्जाचा निर्णय दिनांक २०.०२.२०२५ रोजी झाला असून सदर प्रोबेट अर्जाकामी मृत्यूपत्राची मुळ प्रत दाखल केली होती. सदर प्रोबेट अर्जाचा निर्णय झाल्यानंतर मृत्यूपत्राची मुळ प्रत प्रतिवादी यांना परत मिळू शकली नाही, त्यामुळे सदर प्रतिवादी यांनी सदर मृत्यूपत्राची सहीशिक्याची नक्कल दुय्यम प्रत काढली असून ती आज रोजी दाखल करीत आहेत. सदर मृत्यूपत्राची सही शिक्याची नक्कल सदर दाव्याचा गुणवत्तेवर निर्णय होण्याचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आज रोजी दाखल केलेली कागदपत्रे न्यायालयाने परवानगी दिली तर वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट वादी यांना प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने उलट तपास घेण्याची संधी मिळणार आहे. करीता, प्रतिवादी यांनी दस्त यादीने दिनांक २७.०३.२०१७ रोजीचे मृत्यूपत्राची सही शिक्याची नक्कल अभिलेखात दाखल केली आहे. सदरचे मृत्यूपत्र हे प्रोबेट अर्ज नं. ०६/२०१९ मध्ये शाबीत झाले असल्याने सदर सत्य व प्रमाणित प्रतीस नि.क्र. देण्यात येऊन पुराव्यात वाचण्यावत यावे, अशी प्रतिवादी क्र. १ अ याने विनंती केली आहे.

०३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास जोरदार आक्षेप नोंदविणेत आला आहे. वादी असे कथन करते की, प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकुर खोटा व लबाड असून अर्जात वादातील मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अभिलेखात दाखल करुन घेण्यास कोणतेही संयुक्तिक कारण प्रतिवादी यांना घडलेले नाही. वादी ही प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती करते.

०४. वादी व प्रतिवादी क्र. १अ यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. प्रस्तुत दाव्याच्या अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे सरळ-सरळ दिसून येते की, प्रस्तुत दावा हा जाहिर ठराव, दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप, पृथ्थक कब्जा होवून मिळणेकरीता व पोटगीची रक्कम वसूल होवून मिळणेकरीता दाखल करणेत आलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी त्यांचे पुर्वहक्कदार शिवनाथ यशवंत पवार यांनी दिनांक २७.०३.२०१७ रोजी प्रतिवादी क्र. १अ (प्रतिवादी क्र. २) याचे हक्कात गट क्र. २२७४ बाबत करुन ठेवलेले मृत्यूपत्राची नक्कल प्रत त्यांना

अभिलेखात दाखल करण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी अशा परिस्थितीत असे प्रमाण ठरवून दिले आहे की, एखादया प्रकरणात दुय्यम पुरावा सादर करण्यास न्यायालयाची परवानगी घेणे, त्याकरीता स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक नाही. तथापि, भारतिय साक्ष अधिनियम १९७२ च्या तरतूदी अन्वये एखादया दस्ताची मुळ प्रत गहाळ झाली असेल, फाटली असेल, जळाली असेल तर अशा परिस्थितीत त्याबाबतचा दुय्यम पुरावा दाखल करण्याचा पक्षकारास आपोआप अधिकार प्राप्त होतो. या प्रकरणातील प्रतिवादीने असे कथन केले आहे की, त्यांनी या न्यायालयामध्ये वर नमूद केलेले मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत प्रोबेट अर्ज ०६/२०१९ या प्रकरणात दाखल केली होती व सदर प्रत त्यांना पुन्हा परत मिळालेली नाही. नक्कीच अशा परिस्थितीत प्रतिवादी यांना सदर मृत्यूप्रमाणपत्राबाबत दुय्यम पुरावा सादर करण्याचा अधिकार प्राप्त होतो. जर अर्ज नामंजूर केला तर प्रतिवादी यांना त्यांची बाजू सक्षमपणे सिध्द करण्याची संधी नाकारली जाईल. वादी व प्रतिवादी यांचे मधील प्रलंबित असलेला वाद अंतिमतः व गुणत्तेवर निकाली काढणे शक्य ठरणार नाही. माझ्या मते, प्रस्तुत अर्ज मंजूर केला तर वादी यांचे अतोनात नुकसान होईल, अशी कुठलीही शक्यता दिसून येत नाही. याउलट, नक्कीच अर्ज नामंजूर केला तर प्रतिवादी यांचे अतोनात नुकसान होईल. माझ्या मते, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना शिवनाथ यशवंत पवार यांचे दिनांक २७.०३.२०१७ रोजीचे मृत्यू प्रमाणपत्राबाबत दुय्यम पुरावा सादर करण्याची परवानगी देणेत येत आहे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.09 15:00:56 +0530

दि.०८.०१.२०२६. (सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.